# ग्रीनलॉन्स विदयालय

**इयत्ता – १० वी-अ,ब,क TERMINAL EXAMINATION मार्क – ८0**

**दिनांक -०१ -१० -२०२४ विषय – मराठी वेळ-2 ½तास**

**INSTRUCTIONS- 1. This paper comprises of two sections. Section A and section B.**

**2. Section A & Section B Answers must be written on the answer sheet.**

---

## विभाग- "अ"

**प्रश्न १. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

### मोठे होत असलेल्या मुलांनो

या पत्रातून मी तुम्हांला माझे 'बार्क'मधील दोन अनुभव सांगणार आहे. मला खात्री आहे, माझे हे दोन अनुभव तुम्हांला सांगणार आहे.

तर मुलांनो, आधी मी माझे दोन अनुभव सांगतो. हे दोनही अनुभव मी कॉलेज संपवून 'बार्क'मध्ये ट्रेनिंग स्कूलला गेलो तेव्हाचे आहेत. अरे हो, बार्क म्हणजे काय असा प्रश्न तुम्हांला पडला असेल. सांगतो... 'बार्क' हे 'भामा ॲटॉमिक रिसर्च सेंटर' म्हणजे 'भाभा अणुसंशोधन केंद्र' या नावाचे लघुरूप आहे. होमी भाभा यानी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला, म्हणून त्यांचे नाव या संस्थेला दिले आहे. तर बार्क ही संस्था आता प्रचंड मोठी आहे; पण मी तिथे ट्रेनिंग स्कूलला गेलो तेव्हा ती संस्था सुरू होऊन जेमतेम सात वर्षे झाली होती. आम्ही जवळपास शंभर मुले-मुली होतो. मी ट्रेनिंग स्कूलला असताना होमी भाभा तीन-चार वेळा आले होते. प्रचंड स्फूर्तिदायक व्यक्तिमत्त्य होतं ते. एकदा आम्ही त्यांना विचारलं, "आम्ही इतकी मुलं-मुली आहोत; पण सर्वांना पुरेल इतके काम कुठे आहे इथे?" ते म्हणाले, "तुम्ही त्याची काळजी का करता? तुम्ही सर्वजण संशोधन करत रहा, त्यासाठी सरकारला खर्च किती येतो याचा आत्ता विचार करू नका, मात्र एक करा, तुम्ही स्वतःचं काम निर्माण करा. आपण काय काम करायचं हे तुम्ही स्वतःच ठरवा. बॉसने सांगितलं तेवढंच काम करायचं आणि सांगितलं नसेल तर आपल्याला कामच नाही असं समजायचं, हे चूक आहे. ही प्रवृत्ती गेली पाहिजे." भाभांनी सांगितलेला हा मुद्दा माझ्या मनावर कोरला गेला आणि मुलांनो, स्वानुभवाने सांगतो एकदा हे लक्षात आलं ना, तर स्काय इज द लिमिट, बोट धरून चालवणं किंवा दिशा दाखवणं हे पहिल्या आठ-दहा वर्षांपर्यंत ठीक आहे, आवश्यकही आहे; पण अंतिमत स्वतःच स्वतःला सक्षम करता आलं पाहिजे , ऊर्जा मिळवता आली पाहिजे आणि स्वतःचे मार्ग शोधता आले पाहिजेत.

आता दुसरा अनुभव सांगतो. ट्रेनिंग स्कूलमधील प्रशिक्षण संपवून मी बार्कमध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झालो. तेव्हा तिथे मेटलायझिंग प्रक्रियेवर मला काम करायला सांगण्यात आलं. आमच्याकडे त्यासाठी यंत्रसामग्री होती पण कोणीही ती वापरली नव्हती, म्हणून मी म्हणालो, "मी यावर काम करतो; पण यासाठी मला एक वेल्डर व एक फोरमन यांची गरज आहे." तेव्हा मला सांगण्यात आलं, "तुला आता काहीच मदत मिळणार नाही, तुला स्वतःलाच सर्व करावं लागेल." वरिष्ठांची आज्ञा म्हणून मी सुरुवात केली आणि बरीच धडपड करून ते काम पूर्ण केलं, मग त्यांनी त्या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवली. 'हे करूया, ते करूया', असं बरंच काय काय म्हणाले आणि मग विचारलं, "आता सांग, तुला काय पाहिजे? तुला वेल्डर मिळेल, फोरमन मिळेल, आंणखी जे हवे असेल ते सर्व मिळेल." यावर मी म्हणालो, "आता मला काहीच नको. मी स्वतः सर्व करीन." तेव्हा ते म्हणाले, "काम सुरू करण्याआधीच लोक काय काय मागण्या करतात आणि या वृत्तीमुळेच आतापर्यंत ते काम झालेलं नव्हतं, म्हणून आम्ही तुला वेल्डर व फोरमन दयायला 'नाही' म्हणालो होतो. मात्र आता तुझ्या हाताखाली पाहिजे तेवढे लोक घे, आता ते तुझं ऐकतील, कारण त्यांनी पाहिलंय, तू हे करू शकतोस आणि आता हेही लक्षात घे, की एकटा माणूस जास्त काम करू शकत नाही." थोडक्यात काय, तर तुम्ही करू शकता हे आधी दाखवा, मग इतरांना काम सांगा. आपल्याला येत नसताना दुसऱ्यांना काम सांगणं योग्य नाही. हा धडा त्या दुसऱ्या अनुभवातून मी शिकलो.

**कृती १ : खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा: गुण ५**

१. बार्क म्हणजे काय ?

२. डॉ. होमी भाभा हे व्यक्तिमत्व कसे होते ?

३. भारतातील अणुसंशोधनाचा पाया कोणी घातला ?

४. लेखकाला कोणत्या कामगाराची गरज होती ?

५. मोठे होत असलेल्या मुलांनो या पाठाचे लेखक कोण आहेत ?

**कृती २. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा : गुण २**

१. आपल्याला येत नसताना ---------------------- काम सांगणं योग्य नाही.

२. पण अंतिमत स्वतःच स्वतःला ------------------ करता आलं पाहिजे.

३. मग त्यांनी त्या ---------------- व्याप्ती वाढवली.

४. त्यासाठी -------------------- खर्च किती येतो याचा आत्ता विचार करू नका.

**कृती ३ : खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा : गुण ४**

१. लेखक स्वानुभवाने आपल्याला कोणता संदेश देतात?

२. लेखक दुसऱ्या अनुभवातून कोणता धडा शिकले ते लिहा ?

**कृती ४. कोण कोणास म्हणाले ते लिहा : गुण १**

१. "तुम्ही त्याची काळजी का करता?"

**प्रश्न २. खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा : ( कोणतेही ६) गुण ६.**

१. लेखकाच्या गिरगावातल्या शाळेचे नाव काय होते ?

२. मासे पकडणाऱ्या बाईने आपले छोटे मूल कशात ठेवले होते ?

३. कोणामुळे लेखकाला खेतवाडीतील प्राथमिक शाळेत प्रवेश मिळू शकला ?

४. 'तू बुद्धी दे' या कवितेचे कवी कोण आहेत ?

५. लेखकाच्या हायस्कूलची प्रवेश फी किती होती ?

६. कवीच्या मते कायम कशाची कास धरायला पाहिजे ?

७. उदरनिर्वाहासाठी लेखक आणि त्यांच्या आईला कुठे जावे लागले ?

**प्रश्न ३. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा : गुण ६**

१. "त्या बाळाला आधी ---------- गुंडाळ आणि मग मासे मारत बैस."(शालीत, पदरात ,चादरीत)

२. ---------------- हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते. (ताई , माई , आई)

३. शाल व ---------------------------- यांचा संबंध काय ? ( गलीनता , शालीनता , मलीनता )

४. आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील ---------------- ( साशेल , माशेल , सपशेल)

५. पण तोपर्यंत गिरगावातील त्यावेळेच्या ----------------शाळांमधले प्रवेश बंद झाले होते.

( प्रसिद्ध , अवगत , नामांकित )

६. आमच्या शाळेत दर शनिवारी ------------------------ परीक्षा घेण्यात येत असे.

( वार्षिक , चाचणी , सहामाही)

**प्रश्न ४.(अ) खालील दिलेल्या वाक्प्रचाराचे अर्थ लिहा : ( कोणतेही ६) गुण ६**

१. सन्मार्ग असणे.  २. संघर्ष देणे.  ३. गौरव वाटणे.  ४. नामांकित असणे.

५. उसंत न मिळणे.  ६. नियोजन करणे.  ७. आपुलकी दाखविणे.  ८. उदरनिर्वाह करणे.

**प्रश्न४.(ब) खालील दिलेल्या शब्दांचे अर्थ लिहा: गुण ४**

( सराव, संपूर्ण अधिकार, पायाभूत, लहान रूप, मेहनत, स्वभाव, सर्वकाही, बलवान )

१. लघुरूप  २.मुलभूत  ३.सर्वाधिकार  ४.कष्ट

५. प्रवृत्ती  ६.सर्वस्व  ७.सक्षम  ८.अभ्यास

**प्रश्न ४.(क) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा : गुण ३.**

१.लेखकाला लहानपणी अखंड पेन्सिल भरपूर मिळत असे .

२. लेखक रा. ग.जाधव साहित्य संमेलनाचे बिनविरोध अध्यक्ष झाले.

३. लेखकाच्या हायस्कूलची फी १०० रुपये होती.

**प्रश्न ४. (ड) खालील दिलेल्या शब्दापासून वाक्ये तयार करा : (कोणतेही ३) गुण ३**

**(make meaningful sentences)**

१. संस्कार  २. विश्वास ३. वरिष्ठ ४.मदत ५. नित्य ६. सोबती

**विभाग ‘ ब ’**

**प्रश्न १(अ). खालील अधोरेखित शब्दांचे समानार्थी शब्द बदलून वाक्य पुन्हा लिहा: गुण ३**

१. सरकारी शाळेत अनेक <u>कारकून</u> काम करतात.

२. मला समीरच्या कार्याचे <u>नवल</u> वाटले.

३. संगीताला चित्रकलेच्या स्पर्धेत पहिले <u>इनाम</u> मिळाले.

प्रश्न १(ब). **खालील अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द बदलून वाक्य पुन्हा लिहा: गुण ३**

१. माझी शाळा माझ्या घरापासून <u>जवळ</u> आहे.

२. सचिनने आपली चूक <u>मान्य</u> केली.

३. समीराने केलेल्या कामामुळे तिची <u>अधोगती</u> झाली.

**प्रश्न १.(क) खालील शब्दसमूहाबद्दलएक शब्द लिहा : गुण ३.**

( परावलंबी, भूतदया , स्वावलंबी, प्रवचनकार, कृतज्ञ, गैरहजर, )

१. पशुपक्षांबद्दलचे प्रेम  २. प्रवचन करणारा  ३. स्वतःचे काम स्वतः करणारा

४. केलेल्या उपकारांची जाण ठेवणारा  ५. दुसऱ्यांवर अवलंबून असणारा

६. हजार नसणारा

**प्रश्न २.(अ) वाक्यांचे प्रकार ओळखा: गुण ३**

१. दलित समाजाला हा फार मोठा धक्का होता.

२. विवेकानंदाच्या पाठोपाठ चालत जा.

३. किती गोंडस बाळ आहे तुमचं !

**प्रश्न २. (ब) कंसातील वाक्प्रचारांचे योग्य रूप रिकाम्या जागी लिहा : गुण २**

( खुलासा विचारणे , हातभार लागणे , नावलौकिक होणे )

१. डॉ. रघुनाथ माशेलकरांचा भारत सरकारने गौरव करताच त्यांचा -------------------------

२. अन्वर का जेवला नाही ? याचा ----------------------- अब्दुलने विचारला.

**प्रश्न २.(क) खालील वाक्यातील काळ व प्रकार ओळखा : गुण २**

१. महाराष्ट्र हे एक सुप्रसिद्ध राज्य आहे.

२. केरळमध्ये पावसाने अनेक लोकांचे प्रचंड नुकसान केले .

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा : गुण ६**

१ युवा प्रतिष्ठान , मुंबई यांचेतर्फे आयोजित निबंध स्पर्धेत( ESSAY WRITING COMPETITION) आपल्या मित्राला/मैत्रिणीला प्रथम बक्षीस (FIRST PRIZE) मिळाला म्हणून अभिनंदन (CONGRATULATION ) करणारे पत्र लिहा.

OR

२. विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने (AS A STUDENT REPRESENTATIVE) तुमच्या शाळेच्या ग्रंथालयासाठी ( SCHOOL LIBRARY) आवश्यक पुस्तकांची ( BOOKS) मागणी (ORDER) करणारे पत्र मा. व्यवस्थापक , ज्ञानसागर ग्रंथभांडार , महात्मा गांधी रोड , मुंबई (प.) यांना लिहा .

**प्रश्न ४. खालील दिलेला उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

धावला तो जिंकला

सध्या पाकिस्तानात असलेल्या मुझफ्फरगढ या शहरापासून १० किलोमीटरवर असलेल्या गोबिंदपुरामध्ये मिल्खा सिंग यांचा जन्म झाला. देशाच्या फाळणीनंतरच्या हिंसाचारात त्यांचे पालक व बहिण-भावांची हत्या झाल्याने ते दिल्लीला आले. आयुष्याला कंटाळलेले मिल्खा सिंग भाऊ मालखानच्या आग्रहामुळे लष्करात भरती झाले.

लष्करात भरती झाल्यानतर मिल्खा सिंग यांची अॅथलेटिक्सशी ओळख झाली बालपणी शाळेत जाण्यासाठी दररोज दहा किलोमीटर धावण्याचा सराव त्यांना उपयोगी पडला. भरतीच्यावेळी सक्तीच्या धावण्यामध्ये सहाव्या क्रमाकावर आल्यावर त्यांना लष्कराने विशेष प्रशिक्षणासाठी पाठविले. त्यानंतर त्यानी विविध स्पर्धामध्ये सहभाग घेण्यास सुरूवात केली. मेलबर्न येथे १९५६ मध्ये झालेल्या ऑलिंपिकमध्ये त्यांनी २०० आणि ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यानतर, कटक येथील राष्ट्रीय क्रीडास्पर्धामध्ये त्यांनी या प्रकारात विक्रम नोंदवत सुवर्णपदक पटकावले. १९५८ मध्ये झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी भारताला पहिल्यादाच सुवर्णपदक मिळवून दिले. पाकिस्तानमध्ये अब्दूल खालिक या प्रतिस्पर्ध्यावर यशस्वी मात केल्यावर जनरल अयुब खान यानी त्याना 'द फ्लाईंग शीख' ही उपाधी बहाल केली. जकार्ता येथील आशियाई स्पर्धामध्येही त्यानी सुवर्णपदक जिंकले. १९६० च्या ऑलिंपिकमधील ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत चौथा क्रमांक पटकावल्यामुळे मिल्खा सिंग यांना खरी ओळख मिळाली. या स्पर्धेत त्यांनी ४५.७३ सेकदाची वेळ नोंदवत राष्ट्रीय विक्रम नोंदवला. हा विक्रम तब्बल ४० वर्षे अबाधित होता.

क्रीडाक्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना भारत सरकारने 'पद्मश्री' पुरस्काराने गौरविले. मिल्खा सिंग यांची मुलगी सोनिया यांनी ' द रेस ऑफ माय लाईफ ' हे आत्मचरित्र लिहिले असून, त्यांच्यावर आधारित 'भाग मिल्खा भाग' हा चित्रपट प्रदर्शितही झाला आहे.

मिल्खा सिंग यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत धावपटू म्हणून नावलौकिक मिळविला. गरीब आणि गरजू खेळाडूंसाठी त्यांनी 'मिल्खा सिंग चॅरिटेबल ट्रस्ट' ची स्थापना केली आहे.

कृती १.  खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :      गुण ७.

१. मिल्खा सिंग यांचा जन्म कोणत्या गावी झाला?

२. कोणाच्या आग्रहामुळे मिल्खा सिंग लष्करात भरती झाले?

३. बालपणी मिल्खा सिंग यांना शाळेत जाण्यासाठी किती कि. मी. अंतर धावावे लागे?

४. क्रीडाक्षेत्रातील योगदानाबद्दल मिल्खा सिंग यांना कोणत्या पुरस्कारांनी गौरविले?

५.  'मिल्खा सिंग चॅरिटेबल ट्रस्ट' ची स्थापना कशासाठी करण्यात आली?

६. जनरल अयुब खान  यांनी मिल्खा सिंग यांना  कोणती उपाधी बहाल केली?

७. मिल्खा सिंग यांची मुलगी सोनिया यांनी  कोणते आत्मचरित्र लिहिले?

कृती २:  खालील प्रश्नाचे उत्तर तीन ते चार वाक्यात लिहा :  गुण ३

१. ॲथलेटिक्स क्षेत्रातील मिल्खा सिंग यांचे योगदान स्पष्ट करा.

कृती ३: रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :                    गुण २

१. मिल्खा सिंग यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत धावपटू म्हणून ---------------- मिळविला.

२. ----------------------भरती झाल्यानतर मिल्खा सिंग यांची ॲथलेटिक्सशी ओळख झाली.

३. त्यांच्यावर आधारित --------------------------- हा चित्रपट प्रदर्शितही झाला आहे.

४. देशाच्या फाळणीनंतरच्या हिंसाचारात त्यांचे पालक व ----------------------हत्या झाल्याने ते दिल्लीला आले.

प्रश्न ५.खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा: (ANY 1)  गुण ६

१. अभ्यासाचे महत्व:

मुद्दे : ( अभ्यास का करावा - कसा करावा - कशासाठी करावा - अभ्यास केल्याने काय काय फायदे होतात - नावलौकिक मिळतो )

२. माझा भारत :

मुद्दे : ( जन्मभूमी - विविधता - भारतीय संस्कृती - थोर पुरुषाची जननी - देशाची प्रगती - माझा भारत महान )

३. मी डॉक्टर होणार

मुद्दे : ( डॉक्टर होण्याचा विचार मनात का आला - डॉक्टर होण्यासाठी काय करावे लागेल - अभ्यासाचे महत्व - डॉक्टर होऊन काय करणार - समाजसेवा - देशसेवा )